**येरवडा येथे स्पा सेंटरचे आडुन वेश्या व्यवसाय, सामाजिक सुरक्षा विभागचा छाप्यात चार विदेशी मुलींची सुटका, एक अटक, एक फरार**

पुणे शहरात मसाज पार्लर, स्पा सेंटरचे आडुन गुप्तपणे चालणा-या वेश्या व्यवसायाचे समुळ उच्चाटन करणेचे लक्ष्य मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी ठेवलेले असुन त्यानुसार त्यांनी वेळोवळी गुन्हे शाखेकडील अधिकारी यांना सुचना व आदेश दिले होते.

शिल्पा चव्हाण, पोलीस निरीक्षक सामाजिक सुरक्षा विभाग, पुणे यांना ऑर्चीड थाई स्पा, ललवानी प्रेस्टीज,फिनीक्स चौक सहारा हॉटेलचे वर, येरवडा पुणे या ठिकाणी स्पा सेंटरचे आडुन वेश्या व्यवसाय चालु असल्याची माहीती मिळाली. त्यानुसार सदर ठिकाणी शिल्पा चव्हाण व त्यांचे पथकाने छापा घातला असता तेथे महिला नामे दिव्या भारती ही सदर ठिकाणी स्पा सेंटरचा चालक विशाल जाधव हे दोघे मिळुन ऑर्चीड स्पा सेंटरमध्ये थायलंड देशातील चार युवतींकडुन त्यांना अतिरिक्त पैशांचे आमिष दाखवुन त्यांचेकडुन वेश्या व्यवसाय करवुन घेत होते, नमुद चारही थायलंड देशातील युवतींची सुटका करणेत आली असुन त्यांना रेस्क्यु फाऊंडेशन मध्ये ठेवणेत आले आहे. तसेच मॅनेजर दिव्या भारती हीस गजाआड करणेत आले आहे. स्पा सेंटरचा चालक विशाल जाधव हा मिळुन आला नाही.

सदर कारवाई ही मा.श्री. डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. अशोक मोराळे सो, अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे सो,पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे व मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सहा पोलीस आयुक्त गुन्हे २ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली शिल्पा चव्हाण, पोलीस निरीक्षक सामाजिक सुरक्षा विभाग, सहा पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, पोहवा. प्रकाश मगर, पोहवा. उमेश आटोळे, पोना. राहुल वंजारी, पोना. चंदकांत जाधव, महीला पोलीस हवालदार राजश्री मोहीते, महीला पोलीस नाईक निलम शिंदे, महीला पोलीस शिपाई अक्षता विसापुरे गुन्हे शाखा पुणे शहर यांचे पथकाने पार पाडली.